प्रेस नोट

दिनांक -२०/०७/२०१८.

## नारपोली पोलीस स्टेशन,ठाणे शहर येथील पोलीसांना लाच स्विकारताना अटक

दिनांक १९/०७/२०१८ रोजी नारपोली पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथील सहा पोलीस उप निरीक्षक **बजरंग सीताराम ढोकरे**, वय- ५६ वर्षे व पोलीस नाईक **संतोष म्हाळू इरणक**, वय -४० वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १०,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगहात पकडण्यात आले. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या मालकीच्या जागेवरील पार्कींग सुरू ठेवण्यासाठी व त्यांचेवर कारवाई न करण्यासाठी यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून २०,०००/- लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी अेसीबी ठाणे येथे तक्रार नोंदविली होती. त्याबाबत अेसीबी ठाणे यांनी पडताळणी केली असता, पोनां **संतोष म्हाळू इरणक** यांनी तडजोडीअंती सहा पो उप निरी ढोकरे यांचेसमक्ष १०,०००/-रुपये स्विकारण्याचे मान्य केले.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अेसीबी, ठाणे यांनी सापळ्याचे आयोजन करून लोकसेवक सपोउपनि **बजरंग सीताराम ढोकरे** यांना तक्रारदार यांच्याकडून १०,०००/- रुपये लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले व पोना **संतोष म्हाळू इरणक** यांना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री. अंकुश बांगर, पोलीस उप अधीक्षक, अेसीबी ठाणे हे करत असून त्याचां संपर्क क्रमांक ९८७०४९००९७ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावाा.**

---

१) टोल फ्री :- १०६४

२) दुरध्वानी क्रमांक :- ०२२/२५४२७९७९

३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in

४) वोबसाईट :- www.acbmaharashtra.gov.in

Scanned by CamScanner